# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४.

Office Phone Chairman- (0231) 2690829(O) 2690679 (R) Secretary -2691405 (O) 2656044 (R)
EPBX 2696101,102,103, Fax -2690758 E-mail divsec.kop@gmail.com


क्र.कोविम/लेखा/निबंधस्पर्धा/5841
दिनांक - 10/12/2020

प्रति,

मुख्याध्यापक/ प्राचार्य,
सर्व शाळा / कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा, सांगली, कोल्हापूर.

विषय :- सन 2020-21 या वर्षाकरिता राज्यातील माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांसाठी राज्यस्तरीय निबंध स्पर्धा आयोजित केल्याबाबत.

संदर्भ :- राज्यमंडळाचे क्र.रा.मं./संशोधन/निबंधस्पर्धा/497 दि.27/11/2020 चे पत्र

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, सन 2020-21 या वर्षाकरिता राज्यातील माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यायीन शिक्षकांसाठी राज्यस्तरीय निबंध स्पर्धा आयोजित केली आहे. आपल्या माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा यासाठी आपल्यामार्फत आवाहन करण्यात यावे. सदर स्पर्धेचे निवेदन डिसेंबर 2020 च्या अंकात प्रसिध्दीसाठी देण्यात आलेले आहे. या पत्रासोबत निवेदनाची प्रत व निबंध स्पर्धेबाबतचा तपशील देण्यात आलेला आहे. तरी स्पर्धेचा तपशील आपल्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या निदर्शनास आणावे.

प्र.विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

सोबत :-
निबंध स्पर्धेचे निवेदन व तपशील.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-४.

# *निवेदन*

सन २०२०-२१ या वर्षाकरिता राज्यातील माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांसाठी मंडळाने राज्यस्तरीय निबंध स्पर्धा आयोजित केली आहे. महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा असे मंडळातर्फे आवाहन करण्यात येत आहे.

राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांनी मुख्याध्यापक/प्राचार्यामार्फत आपले निबंध 'मा.सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, बालचित्रवाणी शेजारी, शिवाजीनगर, पुणे-४११००४' **किंवा** 'विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण विभागीय मंडळ' या पत्त्यावर **१५** जानेवारी,**२०२१** अखेर पोहोचतील, अशा रितीने समक्ष सादर करावेत किंवा पोस्टाने पाठवावेत. पाकिटावर " **माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी राज्यस्तरीय निबंध स्पर्धा सन २०२०-२१**"असा ठळक उल्लेख करावा.

मंडळाकडे निबंध सादर करण्याची अंतिम तारीख **१५ जानेवारी, २०२१** अशी आहे. यानंतर प्राप्त झालेले निबंध विचारात घेतले जाणार नाहीत. राज्यस्तरीय निबंध स्पर्धेसंबंधीचे हे निवेदन राज्यातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापकांनी सर्व शिक्षकांच्या निदर्शनास आणून द्यावे, तसेच त्यांना स्पर्धेत सहभागी होण्याकरिता प्रोत्साहित करावे, अशी विनंती आहे.

निबंधाचे विषय

१. तंत्रस्नेही शिक्षक- काळाची गरज

२. वाचनसमृध्दी- शिक्षकांसाठी अपरिहार्य

३. उपक्रमशीलता आणि शिक्षक

४. विद्यार्थी व शिक्षक- शरीर / मनःस्वास्थ्य

५. नवीन शैक्षणिक धोरण आणि माझी भूमिका

(डॉ.अशोक भोसले)<br>
सचिव,<br>
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक<br>
शिक्षण मंडळ, पुणे-०४

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे

## माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी राज्यस्तरीय निबंध स्पर्धा,

---------------- सन २०२०-२०२१-----------------

### *निबंध स्पर्धेचा तपशिल*

अ) सर्व साधारण निकष-

१. आशय संपन्नता २.विचारातील अद्ययावतता, सामाजिक बांधिलकी ३.मांडणी,तर्कशुध्दता

४. भाषा शैली-परिणामकता ५.शुध्दता

**ब) निबंधाबाबत अपेक्षा-**

१. अध्यापकाचे अनुभव, समाज निरीक्षण, चिंतनशिलता, प्रत्यक्ष प्रयोग,उपक्रम यांचे प्रतिबिंब

२. संदर्भासाठी दिलेले ग्रंथ, त्यांचे लेखक, ग्रंथाची आवृत्ती, प्रकाशन, पृष्ठ क्रमांक, इ. बिनचुक माहिती

३. मुद्देसुदपणा, विधायकता व शैक्षणीक दृष्टिकोनअसावा.

क) स्पर्धकाची पात्रता-

मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक/मुख्याध्यापक असावा.

ड) स्पर्धेचे नियम-

१. शब्द मर्यादा ३००० शब्द

२. माध्यम-मराठी, हिंदी किंवा इंग्रजी यापैकी कोणतीही भाषा.

३. निबंध तीन प्रतीत सादर करणे आवश्यक राहील.

४. निबंध सुवाच्च व सुस्पष्ट असावा.

५. चित्रे, आकृत्या असल्यास त्या सुस्पष्ट व सुरेखित असाव्यात.

६. स्पर्धकाने आपले नांव निंबधपत्राच्या कोणत्याही पृष्ठावर लिहू नये.

७ .नियुक्त केलेल्या परीक्षक समितीने दिलेला निर्णय स्पर्धकाना बंधनकारक राहील.

८. पारितोषिक मिळालेले निबंध मंडळाच्या शिक्षण संक्रमण मासिकात यथावकाश प्रसिध्द करण्याबाबतचे अधिकार मंडळास राहतील.

९. स्पर्धेचा निकाल जाहीर करण्याची तारीख निबंध प्राप्त झाल्यापासून साधारण ३ ते ४ महिन्यांच्या कालावधी नंतरची राहील.

इ).निबंधाचे मुल्याकंन करण्याची सर्वसाधारण पध्दतः

| | |
|---|---|
| १.विषयज्ञान | ४०% |
| २.विषय मांडणी | २०% |
| ३.विषयप्रतिभाशैली व मौलिकता | २०% |
| ४.एकूण परिणामकारकता | २०% |

फ) पारितोषिके –

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी पारितोषिके

| | |
|---|---|
| १.प्रथम पारितोषिक | – रू.५०००/–व सन्मानचिन्ह |
| २.व्दितीय पारितोषिक | –रू.३०००/– व सन्मानचिन्ह |
| ३.तृतीय पारितोषिक | –रू.२५००/– व सन्मानचिन्ह |
| ४.चौथै पारितोषिक | –रू.२०००/– व सन्मानचिन्ह |
| ५.पाचवे पारितोषिक | –रू.१५००/– व सन्मानचिन्ह |
| ६.उत्तेजनार्थ (पाच)पारितोषिक प्रत्येकी (एक हजार) | –रू.१०००/– व सन्मानचिन्ह |

ग) प्रमाणित करावयाची माहीती –

स्पर्धकाने निंबधासोबत खालील नमुन्यात वैयक्तिक माहिती व प्रमाणपत्र देणे आवश्यक राहील.

वैयक्तिक माहितीच्या प्रमुख बाबी *

१.संपूर्ण नांव	२.पत्रव्यवहारासाठी पत्ता (पिन कोडसह )

३.स्वतः चा भ्रमणध्वनि क्रमांक/ शाळेचा दुरध्वनी क्रमांक व ई-मेल आय डी

४.शैक्षणिक अर्हता	५.अध्यापनाचा अनुभव (वर्षे)

६.निबंधाचे शिर्षक	७.निबंधाची एकूण पृष्ठ संख्या

## प्रमाणपत्राचा नमुना*

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की ,मी (संपुर्ण नाव )---------------------------------------या माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक/पर्यवेक्षक /उपमुख्याध्यापक/मुख्याध्यापक म्हणून गेली -----वर्षे अध्यापनाचे कार्य करीत आहे. माझा प्रस्तुत निबंध राज्य अथवा राष्ट्रीय स्तरावरील कोणत्याही स्पर्धेसाठी पाठवण्यात आलेला नाही. सदरहु निबंध माझ्या एम.एड.,पीएच.डी.वा अन्य शैक्षणिक अर्हतेशी संबधित नाही. तसेच या निबंधास संस्थेच्या /शाळेच्या वा अन्य अशा कोणत्याही स्पर्धेमध्ये पारितोषिक मिळालेले नाही.

-----------*------------